## कापुरबावडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७४ /२०२५ दि. २४/०१/२०२५

### –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

*****

**ज्याअर्थी, कापूरबावडी वाहतूक उप विभागाचे** हद्दीत घोडबंदर – ठाणे – मुंबई व ठाणे – घोडबंदर वाहीनी माजीवाडा उडड्राण पुलावरील पृष्ठभागाचे मास्टीक असमान ( उंचवटे तयार ) झाले असुन खडड्रे पडलेले असल्याने त्याचे काम करावयाचे असुन घोडबंदर कडुन ठाणे – मुंबईकडे अथवा जे.एन.पी.टी.कडे माजीवाडा उडड्राण पुलावरुन जाणारी तसेच कॅडबरी ठाणे कडुन माजीवाडा उडड्राण पुलावरुन घोडबंदर अथवा कापुरबावडी सर्कल मार्गे जाणारी सर्व प्रकारचे वाहतूक बंद करावी लागणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) घोडबंदर कडुन माजीवाडा उडड्राण पुलावरुन मुंबई जे.एन.पी.टी. कडे तसेच नाशिककडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना ब्रॉडवे पेट्रोलपंपा समोरील ब्रिज चढणी येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने ही ब्रॉडवे पेट्रोलपंपा समोरील स्लिप रोडने पुढे सरळ जावुन कापुरबावडी सर्कल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) मुंबई – ठाणे कडुन माजीवाडा उडड्राण पुलावरुन घोडबंदकडे तसेच कापुरबावडी सर्कल मार्गे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना विवियाना मॉल समोरील डिव्हायडर येथील ब्रिज चढणी येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने ही स्लिप रोडने पुढे सरळ जावुन कापुरबावडी सर्कल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदर अधिसूचना खालील प्रमाणे अंमलात राहील.
१) दिनांक २४/०१/२०२५ रोजी रात्रौ २३:०० ते दिनांक २५/०१/२०२५ रोजी सकाळी ०६:०० वा. पावेतो
२) दिनांक २६/०१/२०२५ रोजी रात्रौ २३:०० ते दिनांक २७/०१/२०२५ रोजी सकाळी ०६:०० वा. पावेतो

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

CamScanner

मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे.पोलीस पत्रक
प्रत :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**
संबंधित स.पो.आ. वाहतूक विभाग, पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner